## दिनांक ०६/०४/२०१० रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उधोग मित्र समिती सभेचे इतिवृत

दि ०६/०४/२०१० रोजी मा. श्री. प्रविण दराडे, जिल्हाधिकारी, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाचे सभागृहात जिल्हा उधोग मित्र समिती सभा संपन्न झाली.

सदर सभेत खालील अधिकारी व औधोगीक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र | उपस्थितांचे नांव | कार्यालय |
|---|---|---|
| १ | श्री.अ.बा.कांबळे | उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य |
| २ | श्री. हेमंत अंबासेलकर | सचिव, बुटीबोरी मॅन्यु. असोशिएशन |
| ३ | श्री. सुनिल आकुलवार | कार्यकारी अभियंता, मऔविमं, वि.क्र. १ नागपूर |
| ४ | श्री. जे.सी.साळुंके | कार्यकारी अभियंता, मऔविमं, नागपूर |
| ५ | श्री. एस बी देशपांडे | एजीएम, भारत संचार निगम लिमी,नागपूर |
| ६ | श्री.एम.एम. शुक्ला | सचिव, एमआयए असोसिएशन, हिंगणा |
| ७ | श्री.पी के भारती | सहाय्यक अभियंता, बुटीबोरी |
| ८ | श्री. झेड आय खान | कार्यकारी अभियंता, VIA उद्योग भवन नागपूर |
| ९ | श्री.चंद्रशेखर बेंद्रे | सहसचिवए एमआयए |
| १० | श्री.डी.पी.वासनिक | सहा.महाप्रबंधक, भारत संचार निगम लि.नागपूर |
| ११ | श्री.के.एम.धर्माणी | कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, वि.२, नागपूर |
| १२ | श्री.पंकज बक्शी | इंडोरामा, बुटीबोरी |
| १३ | श्री. बी.के.रॉय | उपअभियंता, एमआयडीसी, वि.२ नागपूर |
| १४ | श्री. आर.युपाटील | उपप्रादेशिक अधिकारी, एमपीसीबी नागपूर |
| १५ | श्री.वी.डी.चौरसिया | अभियंता सा.बा वि-२ नागपूर |
| १६ | श्री. एस आर गेडाम | अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, नागपूर |
| १७ | श्री. मुकुंद एच लाभे | सा बां विभाग-२ नागपूर |
| १८ | श्री. सी.एल.पाल | बी.पी लि. प्लान्ट इंजि. एमआयडीसी, हिंगणा नागपूर |
| १९ | श्री. डी.एस.देशपांडे | बी.पी लि. प्लान्ट इंजि. एमआयडीसी, हिंगणा नागपूर |
| २० | श्री. मोहन देव | समन्वयक MACCIA |
| २१ | श्री.के.पी.भगत | अधिक्षक अभियंता, मराविविकं, ग्रामीण नागपूर |
| २२ | श्री.एस.एल.तालेवार | कार्यकारी अभियंता, मराविविकं विभाग-२ नागपूर |
| २३ | श्री.डी.एन.भुतडा | अध्यक्ष, कळमेश्वर एमआयडीसी असोसिएशन, कळमेश्वर |
| २४ | श्री. अशोक फेंडरकर | तहसिलदार, तहसिल कार्यालय, नागपूर |
| २५ | श्री.जे.पी.भगत | सहा.अभियंता, मराविविकं बुटीबोरी |
| २६ | श्री. वी.एम.कोल्हे | मुख्य व्यवस्थापक, BOM, RO, सिताबर्डी, नागपूर |
| २७ | श्री. ए.डी.बावने | वरीष्ठ व्यवस्थापक, BOM, RO, सिताबर्डी, नागपूर |
| २८ | श्री. आनंद दुरुगकर | हळदगांव स्टोन क्रशींग, |
| २९ | श्री. एम पी पराते | विभागीय कार्यालय, एमआयडीसी उद्योंग भवन नागपूर |
| ३० | श्री.एम.डब्लु. इंगळे | सहा. व्यवस्थापक, सिकॉम , लि नागपूर |
| ३१ | श्री.एस.सी.टेंभुर्णे | सहाय्यक, एमएसएफसी, नागपूर |
| ३२ | श्री. विलास पुरोहित | जिल्हा अग्रणी बँक अधिकारी, बँक ऑफ इंडिया, नागपूर |
| ३३ | श्री. पी.व्ही.कुंभारे | जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, नागपूर |
| ३४ | श्री. सी.एन.सलामपुरे | उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(पं)जि.प.नागपूर |
| ३५ | श्री. एस. गाढवे | उप प्रादेशिक अधिकारी, एमपीसीबी, उद्योग भवन नागपूर |
| ३६ | श्री. जी.एस.उमप | सदस्य सचिव व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर |

## दिनांक ०६/०४/२०१० रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उधोग मित्र समिती सभेचे इतिवृत

| अ क | संघटनेचे नांव | बैठकीतील विषय | दि ०६/०४/२०१० रोजी झालेल्या जिल्हा उधोग मित्र समितीतील निर्णय | कार्यवाही यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | अ | मागील सभेच्या कार्यवृत्तास मंजुरी | मागील दि १५/०२/२०१० रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तास मंजुरी देण्यात आली. | |
| | ब | **जुने विषय** | | |
| १ | बीएमए नागपूर | तिस-या आय. टी. पार्क प्रगती बाबत :- | मे. मंत्री ग्रुप यांनी आय टी पार्क आराखडयाचे प्रोसेसिंग व नॉन प्रोसेसिंग या दोन भागांमध्ये विभाजन करुन त्याप्रकारे सिमांकन करण्याबाबत एसटीपी, मुंबई यांना विनंती केली असल्याचे तसेच एसटीपी यांनी सदर जागेची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांचा अहवाल अप्राप्त आहे. व एसटीपी च्या मंजुरीनंतर मे. मंत्री ग्रुप आराखडयाचे Master Plan मऔविम नागपूर मार्फत मुख्यालय मुंबई यांना मंजुरीकरीता पाठविण्यात आले होते. मुख्यालयाने त्यात दुरुस्ती सुचवुन ते परत केलेले आहे. सदर बाबतीत में.मंत्री ग्रुप यांचेकडुन सुचविलेल्या दुरुस्तीबाबत माहिती प्राप्त होताच ते मुख्यालय मुंबई यांचेकडे पाठविण्यात येईल असे मऔविमं तर्फे सभेत सांगण्यात आले. | मे.मंत्री,ग्रुप कार्यकारी अभियंता, मऔविम नागपूर |
| २ | बीएमए नागपूर | १९९५ पुर्वी एमआयडीसी तर्फे एमआयडीसी बुटीबोरी मध्ये औद्योगिक वापरासाठी वाटप करण्यात आलेले भुखंड / जागा रद्द करण्याबाबत. | बुटीबोरी औधागिक क्षेत्रात ज्या घटकाने विहीत कालावधीमध्ये कार्यवाही केलेली नाही. अशा १७० घटकाचे भुखंडापैकी परत आलेल्या व पंचनामा करुन परत घेतलेल्या भुखंडामधुन १४६भुखंडाचे वाटप करण्यात आले. व २८ भुखंड वाटपास उपलब्ध आहेत असे मऔविमंचे प्रतिनिधींनी सभेत सांगीतले. तसेच वाटप झालेल्या भुखंडाची यादी तसेच रिकाम्या भुखंडाची यादी घटकाचे नावासह सीडीवर औद्योगिक संघटनेस विभागीय अधिकारी, मऔविमं यांनी पाठवावी असे ठरले. | विभागीय अधिकारी, मऔविम नागपूर |
| ३ | हळदगांव परीसरातील स्टोन क्रशिंग घटक | हळदगांव खदान ते मेनरोड, वर्धा हा खनिज निधीतून रस्ता तयार करण्याबाबत. | हळदगांव परिसरातील खदान ते मेन रोड वर्धा हा रस्ता तया करण्याकरीता Estimate दि.३१/१२/०९ रोजी खनिकर्म कार्यालयाकडे पाठविल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनीधीनी सभेत सांगितले. | खनिकर्म कार्यालय व सार्वजनिक बांधकाम विभाग (राज्य ) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | एमआयए | एमआयडीसी हिंगणा येथील दुरध्वनीबाबत | टेलीफोन विभागाशी संबधित काम पुर्ण होण्याकरीता कमीत कमी एक ते दीड वर्ष लागेल असे दुरध्वनी कार्यालयाचे अधिका-यांनी सांगितले. मधल्या काळाता गैरसोय टाळण्यासाठी ज्या घटकाकडे दुरध्वनीची गैरसोय आहे. त्यांनी WLL Call Transfer Facility विनामुल्य आहे ती घ्यावी. जेणेकरुन त्यांचे जुने दुरध्वनी क्रमांक बदलणार नाहीत. यावर तसा प्रस्ताव टेलीफोन विभागाने औद्योगिक संघटनांना त्वरीत दयावा. जेणेकरुन त्यांच्या सदस्य उद्योजकांना तसे कळविण्यात येईल असे सभेत ठरले. | भारत संचार निगम लिमीटेड, नागपूर व एमआयए |
| ५ | एमआयडीसी कळमेश्वर | दुरध्वनी सेवेबाबत | एमआयडीसी येथील टेलीफोन सेवा सुरु झाल्याचे मागील सभेत भारत संचार निगम लि. च्या अधिका-यांनी सभेत सांगितले होते. औद्योगिक संघटनांचे प्रतिनीधी त्यावेळी हजर नसल्यामुळे त्यांची प्रतिक्रीया समजु शकली नव्हती. परंतु काही उद्योगांना मिळणारी टेलीफोन सुविधा अजुनही समाधानकारक नसल्याचे औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधींनी सभेत सांगितले. यावर औद्योगिक सघटनेने टेलीफोन विभागाशी चर्चा करुन समस्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न करावा तसेच टेलीफोन विभागास याबाबत वेगळे कळविण्यात यावे असे ठरले. | औद्योगिक संघटना, भारत संचार निगम लि, जिउकें |
| ६ | बुटीबोरी एमआयडीसी | बुटीबोरी एमआयडीसी येथील सबस्टेशनच्या क्षमता वृध्दीबाबत. | बुटीबोरी येथील सबस्टेशनमध्ये प्रत्येकी १० मेगावॅट चे दोन ट्रान्सफार्मर इन्स्टॉल करण्यात आले असून त्यापैकी एक कार्यरत झाल्याचे विदयुत विभागाचे प्रतिनिधींनी सभेत सांगितले. तसेच Tripping चे प्रमाण देखील कमी झाल्याबाबत सभेत सांगण्यात आले. संबधित प्रश्नाचे निराकरण झाले असल्यामुळे सदर विषय विषयसुचीवरुन काढण्यात यावी असे सर्वानुमते सभेत ठरले. (विषय बंद) | |
| ७ | मऔविम | बुटीबोरी एमआयडीसी क्षेत्रातील अवैध उत्खननाबाबत. | एमआयडीसी क्षेत्रातील अवैध उत्खनन सद्यस्थितीत बंद झाले असल्याचे कार्यकारी अभियंता, मऔविमं यांनी सभेत सांगितले. परंतु एमआयडीसी क्षेत्राबाहेर उत्खनन अजुनही चालु असते व ते पुन्हा अवैध उत्खनन मऔविमं क्षेत्रात चालु करु शकतात असे औद्योगिक सघटनांनी सांगितले. यावर तहसिलदार हिंगणा व तहसिलदार, नागपूर ग्रामीण यांना कळविण्यात यावे असे ठरले. | तहसिलदार हिंगणा व मऔविमं |
| ८ | एमआयडीसी कळमेश्वर | कळमेश्वर बायपास रोड सुरु होण्याबाबत | कळमेश्वर बायपास रोड सार्वजनिक रहदारीकरीता सुरु झाला असला तरी तेथील डांबरीकरणाचे काम फार संथगतीने सुरु असल्याचे औद्योगिक संघटनेच्या प्रतिनीधींनी सभेत सांगितले. तसेच सदर रस्ता सद्यस्थितीत वाहतुकीस योग्य नसल्याचे औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधीनी सभेत सांगितले. | सार्वजनिक बांधकाम विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | यावर सार्वजनिक बांधकाम विभाग योग्य ती कार्यवाही त्वरीत सुरु करुन झालेल्या प्रगतीबाबत पुढील सभेस अवगत करतील असे ठरले. | |
| ९ | एमआयए | E.S.I.S हॉस्पीटलच्या दुरावस्थेबाबत. | E.S.I.S इस्पितळातील उपकरणे बरीच जुनी असुन कार्यक्षम नाही. तिथे् वेळेवर डॉक्टर मिळत नाही. औषधी मिळत नाही. तसेच तिथे जाणा-या कामगारांची तेथील अधिकारी व कर्मचा-यांचे अनास्थेमुळे फार गैरसोय होते असे औद्योगिक संघटनेच्या पदाधिका-यांनी सांगितले. यावर संबधित विभागातील अधिका-यांशी जिल्हाधिकार-यां मार्फत एक वेगळी सभा घेण्यात यावी असे अध्यक्षांनी सभेस सुचिवले. तसेच बुटीबोरी येथे दवाखान्याकरीता प्लॉट मिळण्यासाठी E.S.I.S ने अर्ज केला असल्याचे व त्यांना त्वरीत प्लॉट देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे बीएमएच्या पदाधिका-यांनी सभेत मागणी केली. त्यावर प्रकरणात योग्य ती कार्यवाही त्वरीत करुन सद्यस्थिती पुढील सभेत संबधितांनी अवगत करावी असे अध्यक्षांनी सुचित केले. | जिल्हा उद्योग केंद्र व E.S.I.S |
| १० | **एमआयए** | कामगार खात्याकडुन बंद करण्याकरीता मिळणा-या ना हरकत प्रमाणपत्राबाबत. | बंद कारखाने घेतांना असे कारखाने घेणा-या उद्योजकांना कामगार विभागाकडुन ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागते. परंतु ते देण्याचे अधिकारी स्थानिक अधिका-यांना नसल्यामुळे प्रकरणे मुंबईला पाठविल्या जातात आणि बराच काळ प्रलंबित राहतात असे औद्योगिक संघटनेच्या प्रतिनधिंनी सभेत सांगितले आणि कमीत कमी ज्या प्रकरणांमध्ये कामगार विभागाचे कुठलेही घेणे नाही अशा प्रकरणांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार स्थानिक अधिका-यांना असावे अशी मागणी केली. यावर असा प्रस्ताव मुंबई कार्यालयास पाठविला असल्याचे कामगार विभागाचे प्रतिनीधीनीं सभेस सांगितले. सद्यस्थिती ते पुढील सभेत अवगत करतील असे ठरले. | कामगार विभाग |
| ११ | **बीएमए** | बुटीबोरी एमआयडीसी टी पांईट जवळच्या रस्त्यावरील रहदारीच्या असुविधेबाबत. | बुटीबोरी एमआयडीसी क्षेत्रात सुरवातीच्या टी पाइट जवळील रस्त्यावर वाढत्या रहदारीमुळे सर्वांना फार असुविधा होते असे औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधींनी सांगितले यावर नॅशनल हायवे व एमआयडीसी मिळून संयुक्त कार्यवाहीचे नियोजन करण्यात येत असल्याबाबत कार्यकारी अभियंता मऔविमं यांनी सभेत सांगितले. त्यासाठी एक वेगळया चौकाची निर्मीती करण्यात येत असून त्यासाठी खडीकरणाचे काम मऔविमं करणार असुन डांबरीकरण नॅशनल हायवेतर्फे करण्यात येईल असे सभेत सांगितले. परंतु नॅशनल हायवे ने त्याठिकाणी रस्ता दुभाजक तोडुन वाहतुक करण्यास मनाई केली असल्याचे कार्यकारी अभियंता मऔविमंने सभेत सांगितले. यावर औद्योगिक संघटना, मऔविमं आणि नॅशनल हायवे यांनी एकत्र चर्चा करुन प्रश्न निकाली काढावा | मऔविम, नॅशनल हायवे् व औद्योगिक संघटना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | असे मा. अध्यक्षांनी सुचित केले. | |
| १२ | **बीएमए** | बुटीबोरी मऔविमं क्षेत्रात विजेच्या दुरुस्तीसाठी शिडी असलेल्या वाहनाच्या गरजेबाबत. | बुटीबोरी मऔविम क्षेत्रात वेळोवेळी विद्युत संबधी दुरुस्तीकरीता शिडी असलेल्या वाहनाची गरज भासते. मराविविकं तर्फे ते देण्यात आल्यास त्या संबधात फार सुविधा होईल. या संदर्भात प्रस्ताव मुख्यालयास पाठविण्यात आल्याचे मराविविकं अधिका-यांनी सभेत सांगितले. त्यावर औद्योगिक संघटना असे वाहन तयार करुन देण्यास तयार असुन विद्युत विभागाने कर्मचा-यांची व्यवस्था करावी असे औ. संघटनेने सांगितले. औद्योगिक संघटनेचा प्रस्ताव विद्युत विभागाने मान्य करण्यास हरकत नाही असे मा. अध्यक्षांनी सभेस सांगितले. | मराविविकं व औद्योगिक संघटना |
| १३ | **बीएमए** | अवैधपणे Fly Ash मऔविमं क्षेत्रात डम्प करण्याबाबत. | में.इंडोरामा या घटकात निर्माण होणारी Fly Ash टाकण्याकरीता मऔविमं बुटीबोरी क्षेत्राच्याबाहेर जागा दिलेली असली तरी Fly Ash च्या वाहतुकी दरम्यान ती रस्त्यावर पडते आणि ती उडाल्यामुळे जाणा-या येणा-यांना तसेच स्थानिक उद्योजकांना त्रास होतो असे औद्योगिक संघटनांनी सांगितले. यावर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने योग्य ती कार्यवाही त्वरीत करावी असे मा. अध्यक्षांनी आदेश दिले. | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ |
| | **क** | **नविन विषय** | | |
| १ | **व्हीआयए व एमआयए** | मऔविमं हिंगणा क्षेत्रात होणा-या प्रदुषित पाणी पुरवठयाबाबत. | या संदर्भात मऔविमंने नागपूर महानगरपालीकेशी संपर्क साधला असता पाणी देण्याबाबत असमर्थता दर्शविली. तद्नंतर मऔविमंने महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कार्यालयाशी संपर्क साधला असता त्यांनी पिण्याचे पाणी देण्याची तयारी दर्शविल्याचे कार्यकारी अभियंता मऔविमंने सभेत सांगितले. यावर या संबधात योग्य तो प्रस्ताव मऔविमंने त्यांचे् मुख्यालयास पाठवुन वरिष्ठांची मान्यता घ्यावी असे अध्यक्षांनी सुचविले. | मऔविमम |

सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यांत आले.

मा. जिल्हाधिकारी
नागपूर

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,नागपूर.

**जिल्हास्तरीय आजारी उद्योग समिती सभेचे कार्यवृत्त दि.०६/०४/२०१०**

दि ०६/०४/२०१० रोजी मा.प्रविण दराडे, जिल्हाधिकारी, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाचे सभागृहात जिल्हास्तरीय आजारी उद्योग समितीची सभा संपन्न झाली.

सदर सभेत खालील अधिकारी व औधोगीक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र | उपस्थितांचे नांव | कार्यालय |
|---|---|---|
| १ | श्री.अ.बा.कांबळे | उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य |
| २ | श्री. हेमंत अंबासेलकर | सचिव, बुटीबोरी मॅन्यु. असोशिएशन |
| ३ | श्री. सुनिल आकुलवार | कार्यकारी अभियंता, मऔविमं, वि.क्र. १ नागपूर |
| ४ | श्री. जे.सी.साळुंके | कार्यकारी अभियंता, मऔविमं, नागपूर |
| ५ | श्री. एस बी देशपांडे | एजीएम, भारत संचार निगम लिमी,नागपूर |
| ६ | श्री.एम.एम. शुक्ला | सचिव, एमआयए असोसिएशन, हिंगणा |
| ७ | श्री.पी के भारती | सहाय्यक अभियंता, बुटीबोरी |
| ८ | श्री. झेड आय खान | कार्यकारी अभियंता, VIA उद्योग भवन नागपूर |
| ९ | श्री.चंद्रशेखर बेंद्रे | सहसचिवए एमआयए |
| १० | श्री.डी.पी.वासनिक | सहा.महाप्रबंधक, भारत संचार निगम लि.नागपूर |
| ११ | श्री.के.एम.धर्माणी | कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, वि.२, नागपूर |
| १२ | श्री.पंकज बक्शी | इंडोरामा, बुटीबोरी |
| १३ | श्री. बी.के.रॉय | उपअभियंता, एमआयडीसी, वि.२ नागपूर |
| १४ | श्री. आर.युपाटील | उपप्रादेशिक अधिकारी, एमपीसीबी नागपूर |
| १५ | श्री.वी.डी.चौरसिया | अभियंता सा.बा वि-२ नागपूर |
| १६ | श्री. एस आर गेडाम | अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, नागपूर |
| १७ | श्री. मुकुंद एच लाभे | सा बां विभाग-२ नागपूर |
| १८ | श्री. सी.एल.पाल | बी.पी लि. प्लान्ट इंजि. एमआयडीसी, हिंगणा नागपूर |
| १९ | श्री. डी.एस.देशपांडे | बी.पी लि. प्लान्ट इंजि. एमआयडीसी, हिंगणा नागपूर |
| २० | श्री. मोहन देव | समन्वयक MACCIA |
| २१ | श्री.के.पी.भगत | अधिक्षक अभियंता, मराविविकं, ग्रामीण नागपूर |
| २२ | श्री.एस.एल.तालेवार | कार्यकारी अभियंता, मराविविकं विभाग-२ नागपूर |
| २३ | श्री.डी.एन.भुतडा | अध्यक्ष, कळमेश्वर एमआयडीसी असोसिएशन, कळमेश्वर |
| २४ | श्री. अशोक फेंडरकर | तहसिलदार, तहसिल कार्यालय, नागपूर |
| २५ | श्री.जे.पी.भगत | सहा.अभियंता, मराविविकं बुटीबोरी |
| २६ | श्री. वी.एम.कोल्हे | मुख्य व्यवस्थापक, BOM, RO, सिताबर्डी, नागपूर |
| २७ | श्री. ए.डी.बावने | वरीष्ठ व्यवस्थापक, BOM, RO, सिताबर्डी, नागपूर |
| २८ | श्री. आनंद दुरुगकर | हळदगांव स्टोन क्रशींग, |
| २९ | श्री. एम पी पराते | विभागीय कार्यालय, एमआयडीसी उद्योंग भवन नागपूर |
| ३० | श्री.एम.डब्लु. इंगळे | सहा. व्यवस्थापक, सिकॉम , लि नागपूर |
| ३१ | श्री.एस.सी.टेंभुर्णे | सहाय्यक, एमएसएफसी, नागपूर |
| ३२ | श्री. विलास पुरोहित | जिल्हा अग्रणी बॅंक अधिकारी, बॅंक ऑफ इंडिया, नागपूर |
| ३३ | श्री. पी.व्ही.कुंभारे | जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, नागपूर |
| ३४ | श्री. सी.एन.सलामपुरे | उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(पं)जि.प.नागपूर |
| ३५ | श्री. एस. गाढवे | उप प्रादेशिक अधिकारी, एमपीसीबी, उद्योग भवन नागपूर |
| ३६ | श्री. जी.एस.उमप | सदस्य सचिव व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर |

१. मागील दि.१५/०२/२०१० रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

२. मे. सौभाग्य कल्पतरु प्रा. लिमी, हिंगणघाट जि. वर्धा यांचे प्रकरण जिल्हाधिकारी वर्धा यांच्याशी संबधित असल्यामुळे मागील सभेत ठरल्याप्रमाणे पुढील कार्यवाहीकरीता महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, वर्धा व जिल्हाधिकारी वर्धा यांना कळविल्याबाबत महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, यांनी सभेत सांगितले. (विषय बंद)

३. मे. शिंदे रबर इंडस्ट्रिजचे संदर्भात जमिनीबाबत फेरफार घेण्याची कार्यवाही पूर्ण झाली असल्याचे तहसिलदार नागपूर ग्रामीण यांनी सभेत सांगितले. प्रकरणात कार्यवाही पुर्ण झाली असल्यामुळे सदर विषय बंद करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. (विषय बंद)

४. मे. युनिवर्सल अस्बेस्टॉस सिमेंट प्रॉडक्टस, डी-१८, एमआयडीसी हिंगणा, नागपूर या प्रकरणात प्रो. मोहन देव यांनी बँक ऑफ महाराष्ट्र, सिताबर्डी, डिवीजन ऑफीस यांनी अर्जदाराच्या ऑफर पेक्षा अत्यंत कमी किंमतीत एआरसीआयएल यांना मालमत्ता विकली असे सभेच्या निदर्शनास आणुन दिले. यावर संबधित अधिका-याची Accountibility नक्की करण्याबाबत कार्यवाही बँक स्तरावर सुरु असल्याचे DGM, बँक ऑफ महाराष्ट्र यांनी सभेत सांगितले. संबधित प्रकरणात उद्योजकाने CBI ची मदत घ्यावी असे अध्यक्षांनी सुचविले.

५. मे. श्री विष्णु प्लॉस्ट लाईम या उद्योगाचे ओटीएस अंतर्गतचे प्रकरण एमएसएफसी मार्फत त्यांचे मुख्यालयास मंजुरीकरीता पाठविण्यात आले असून सदर प्रकरणात मंजुरी प्राप्त झाल्याचे एमएसएफसी चे अधिका-यांनी सभेत सांगितले. त्यावर सर्वानुमते विषय बंद करावा असे ठरले. (विषय बंद)

६. रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार आर्थिक मंदीच्या काळात राष्ट्रीयकृत तसेच सहकारी बँकानी औद्योगिक घटकांना रीफेजमेंटचे फायदे दयावे अशी औद्योगिक संघटनेच्या प्रतिनीधींनी सभेत सुचना केली. सदर विषय बँकेच्या पुढील DLCC सभेत घेण्यात यावा असे अध्यक्षांनी सुचिवले. त्यावर जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकांनी DLCC सभेत घेण्याचे मान्य केले.

सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

मा. जिल्हाधिकारी<br>नागपूर

महाव्यवस्थापक,<br>जिल्हा उद्योग केंद्र,नागपूर.

**दिनांक ०६/०४/२०१० रोजी संपन्न झालेल्या सुक्ष्म,लघु,मध्यम, मोठया व विशाल औद्योगीक - उपक्रमांमध्ये किमान ८० टक्के स्थानिक उमेदवारांना नौकरीमध्ये प्राधान्याने घेण्याबाबतच्या सभेचे कार्यवृत्त**

दि.०६/०४/२०१० रोजी मा.श्री. प्रविण दराडे, जिल्हाधिकारी, नागपूर यांचे जिल्हाधिकारी, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाचे सभागृहात सुक्ष्म,लघु,मध्यम, मोठया व विशाल औद्योगीक -उपक्रमांमध्ये किमान ८० टक्के स्थानिक उमेदवारांना नौकरीमध्ये प्राधान्याने घेण्याबाबतची सभा संपन्न झाली.

सदर सभेत खालील अधिकारी व औधोगीक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र | उपस्थितांचे नांव | कार्यालय |
|---|---|---|
| १ | श्री.अ.बा.कांबळे | उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य |
| २ | श्री. हेमंत अंबासेलकर | सचिव, बुटीबोरी मॅन्यु. असोशिएशन |
| ३ | श्री. सुनिल आकुलवार | कार्यकारी अभियंता, मऔविमं, वि.क्र. १ नागपूर |
| ४ | श्री. जे.सी.साळुंके | कार्यकारी अभियंता, मऔविमं, नागपूर |
| ५ | श्री. एस बी देशपांडे | एजीएम, भारत संचार निगम लिमी,नागपूर |
| ६ | श्री.एम.एम. शुक्ला | सचिव, एमआयए असोसिएशन, हिंगणा |
| ७ | श्री.पी के भारती | सहाय्यक अभियंता, बुटीबोरी |
| ८ | श्री. झेड आय खान | कार्यकारी अभियंता, VIA उद्योग भवन नागपूर |
| ९ | श्री.चंद्रशेखर बेंद्रे | सहसचिवए एमआयए |
| १० | श्री.डी.पी.वासनिक | सहा.महाप्रबंधक, भारत संचार निगम लि.नागपूर |
| ११ | श्री.के.एम.धर्माणी | कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, वि.२, नागपूर |
| १२ | श्री.पंकज बक्शी | इंडोरामा, बुटीबोरी |
| १३ | श्री. बी.के.रॉय | उपअभियंता, एमआयडीसी, वि.२ नागपूर |
| १४ | श्री. आर.युपाटील | उपप्रादेशिक अधिकारी, एमपीसीबी नागपूर |
| १५ | श्री.वी.डी.चौरसिया | अभियंता सा.बा वि-२ नागपूर |
| १६ | श्री. एस आर गेडाम | अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, नागपूर |
| १७ | श्री. मुकुंद एच लाभे | सा बां विभाग-२ नागपूर |
| १८ | श्री. सी.एल.पाल | बी.पी लि. प्लान्ट इंजि. एमआयडीसी, हिंगणा नागपूर |
| १९ | श्री. डी.एस.देशपांडे | बी.पी लि. प्लान्ट इंजि. एमआयडीसी, हिंगणा नागपूर |
| २० | श्री. मोहन देव | समन्वयक MACCIA |
| २१ | श्री.के.पी.भगत | अधिक्षक अभियंता, मराविविकं, ग्रामीण नागपूर |
| २२ | श्री.एस.एल.तालेवार | कार्यकारी अभियंता, मराविविकं विभाग-२ नागपूर |
| २३ | श्री.डी.एन.भुतडा | अध्यक्ष, कळमेश्वर एमआयडीसी असोसिएशन, कळमेश्वर |
| २४ | श्री. अशोक फेंडरकर | तहसिलदार, तहसिल कार्यालय, नागपूर |
| २५ | श्री.जे.पी.भगत | सहा.अभियंता, मराविविकं बुटीबोरी |
| २६ | श्री. वी.एम.कोल्हे | मुख्य व्यवस्थापक, BOM, RO, सिताबर्डी, नागपूर |
| २७ | श्री. ए.डी.बावने | वरीष्ठ व्यवस्थापक, BOM, RO, सिताबर्डी, नागपूर |
| २८ | श्री. आनंद दुरुगकर | हळदगांव स्टोन क्रशींग, |
| २९ | श्री. एम पी पराते | विभागीय कार्यालय, एमआयडीसी उद्योंग भवन नागपूर |
| ३० | श्री.एम.डब्लु. इंगळे | सहा. व्यवस्थापक, सिकॉम , लि नागपूर |
| ३१ | श्री.एस.सी.टेंभुर्णे | सहाय्यक, एमएसएफसी, नागपूर |
| ३२ | श्री. विलास पुरोहित | जिल्हा अग्रणी बँक अधिकारी, बँक ऑफ इंडिया, नागपूर |

| | | |
|---|---|---|
| ३३ | श्री. पी.व्ही.कुंभारे | जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, नागपूर |
| ३४ | श्री. सी.एन.सलामपुरे | उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(पं)जि.प.नागपूर |
| ३५ | श्री. एस. गाढवे | उप प्रादेशिक अधिकारी, एमपीसीबी, उद्योग भवन नागपूर |
| ३६ | श्री. जी.एस.उमप | सदस्य सचिव व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर |

सदर सभेत महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर यांनी स्थानिक उमेदवारांची व्याख्या सांगतांना अधिक्षकीय पदांमध्ये कमीत कमी ५० टक्के व अधिक्षकीय धरुन एकूण सर्वकर्मचारी हे ८० टक्के पेक्षा जास्त स्थानिक असावे असे सांगीतले. एखादया उद्योगातील कर्मचारी हा जरी मराठी नसला तरी त्या उद्योगात किंवा महाराष्ट्रात कमीतकमी १५ वर्ष कार्यरत असला तर त्यास स्थानिक म्हणून संबोधण्यात यावे असेही त्यांनी सभेत सांगीतले. याबाबतीत त्यांनी सभेस अवगत केले की सद्यस्थितीत मोठया औद्योगीक उपक्रमांकडून यासंबंधात शासनाच्या विहीत नमुना स्थालोरो-१ (ELP-१) मध्ये माहिती देण्यात आलेली आहे. तसेच ELP-१ नमुन्यात माहिती सुक्ष्म, लघु व मध्यम औद्योगीक उपक्रमाकडून देखील घेण्याची कार्यवाही जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर मार्फत सुरु आहे. यासंदर्भात सर्व औद्योगीक संघटनांनी त्याचे सदस्य उद्योजकांना जिल्हा उद्योग केंद्रास या कार्यात सहकार्य करण्याबाबतच्या सुचना करण्याची विनंती करण्यात आली असल्याचे त्यांनी सभेत सांगीतले. उद्योगांकडून माहिती घेण्यात यावी अशा सुचना अध्यक्षांनी सभेत दिल्या.

सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

मा.जिल्हाधिकारी
नागपूर

महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर